# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/06/2023 (बुधवार) सायंकाळ

---

### सार्वजनिक मालमत्तेचे नूकसान करून रेतीची चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद पोलीस स्टेशन खापाची कार्यवाही

दिनांक ०४/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन खापा येथील पोलीस स्टाफ हे सावनेर उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे खापा हद्दीतील ०४ किमी अंतरावर खुबाळा शिवार येथे यातील **आरोपी क्र. १) नामे– सूनिल पंढरी डोंगरे, २) अनिल देवराव खूबाळकर ३) वासूदेव भास्कर वाडकर तिन्ही रा खूबाळा** यांनी खूबाळा गावातील उच्च प्राथमिक शाळे लगत असलेल्या सार्वजनिक मालमत्ता असलेल्या नाल्याची बंदीस्त पार फोडल्यामूळे पावसाळयामध्ये नाल्याला पूर येवून नाल्याच्या पाण्याची दिशा बदलण्याची शक्यता असल्याने ते पाणी गावातील अथवा लोकांच्या शेतामध्ये जावून एखादया वेळेस शेतातील पिक उत्पन्नाला नूकसान होवून उत्पन्नामध्ये घट होवून शकते व नाला फोडल्यामूळे आजूबाजूस राहणाऱ्या लोकांना सामायिक पणे नूकसान व धोका होवून शकतो याबाबत माहीती असतांना देखिल आरोपी क्र. १ २ व ३ यांनी संगणमत करून वरील नाल्याची पार फोडुन शासनाचे नूकसान करून वरील आरोपी व सोबत आरोपी क्र. ४) हर्षल मोहटे रा. खापा ५) अमोल उदाराम अडकणे यांनी ट्रक व ट्रॅक्टरच्या साहाय्याने वरील नाल्यातील सूमारे २०,००,०००/– रू किंमतीची १००० ब्रास रेती चोरून नेली तसेच आरोपी क्र. ५ यांनी सदर रेती चोरून नेण्यासाठी वरील आरोपीतांना सहकार्य केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– देविदास पांडूरंग आंबोरे, वय ३३ वर्ष रा. तहसिल कार्यालय सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ४२७, २६८, ४३० सहकलम सार्वजनिक मालमत्ता अधि. १९८४ कलम ३ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक खडसे मो. नं. ९४२१०५०३७० हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. बेला :– अंतर्गत जैतापुर येथे दिनांक १३/०६/२०२३ चे १२.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन बेला येथील पोलीस स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, काही इसम अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करीत आहे अशा मिळालेल्या माहितीवरून नमुद घटनास्थळी जावुन नाकाबंदी दरम्यान टिप्पर क्र. एम. एच.–४०/सि.डी–५५९० चा चालक **आरोपी नामे– कोमलदास पत्रुघन देवाडे, वय २३ वर्ष, रा. कानपा ता. नागभीड जि. चंद्रपूर** हा **२) टिप्पर मालक नामे– प्रफुल देशमुख वय ३२ वर्ष, रा. उमरेड** यांच्या सांगण्यावरून त्याचे टिप्पर क्र. एम. एच.– ४० सि.डी–५५९० मध्ये एकुण अंदाजे ८ ब्रास रेती किंमती अंदाजे ३२०००/– रूपयाचा मुद्देमाल चोरी करून अवैध्यरित्या विनापरवाना त्याचे टिप्पर मध्ये वाहतुक करताना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून असा एकुण ३२०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस उपनिरीक्षक प्रितम निमगडे पोस्टे बेला यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम १०९, ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रितम निमगडे पोस्टे बेला मो. नं. ८९९९९१७११२ या करीत आहे

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर